सन २०१७-१८च्या खरीप व रब्बी हंगामात हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये व मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये सहकारी कर्जाचे पुनर्गठन व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-०४१८/प्र.क्र. २६ /२-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३१ मे, २०१८

वाचा - १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.१७३/म-७ दि.३०.१०.२०१७
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एससीवाय २०१७/प्र.क्र.२७०/म-७ दि. २८.२.२०१८
३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण २०१७/प्र.क्र.१७३/म-७दि. २५.४.२०१८

शासन परिपत्रक :-

सन २०१७-१८ मध्ये राज्यातील खरीप व रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या गावांमध्ये शासनामार्फत विविध उपाय योजना जाहीर करण्यात आले आहेत. उपरोक्त वाचा येथील अ.क्र. २ येथील शासन निर्णय दि. २८.२.२०१८ नुसार राज्यातील सन २०१७-१८ च्या खरीप हंगामातील हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी असलेल्या **१४६६९** गावात विविध उपाय योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. तसेच, अ.क्र. १ येथील शासन निर्णय दि. ३०.१०.२०१७ अन्वये खरीप हंगाम सन २०१७-१८ मध्ये व अ. क्र. ३ येथील शासन निर्णय दि. २५.४.२०१८ अन्वये रब्बी हंगाम सन २०१७-१८ मध्ये राज्यातील काही तालुक्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केला आहे व या तालुक्यांमध्ये विविध उपाय योजना जाहीर करण्यात आल्या आहेत. उपरोक्त नमूद शासननिर्णयामध्ये सहकार विभागाशी संबंधित **१)** शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती व **२)** सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन या उपाय योजनांचा समावेश आहे.

२. अ) संदर्भाधीन वाचा अ.क्र. १ येथे नमूद केलेल्या दि. ३०.१०.२०१७च्या शासन निर्णयात नमूद मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केलेल्या खालील तालुक्यांतील-

अ.क्र.	जिल्हा	तालुके
१	गोंदिया	गोंदिया, तिरोडा,गोरेगाव

ब) संदर्भाधीन वाचा अ.क्र. ३ येथे नमूद केलेल्या दि. २५.४.२०१८च्या शासन निर्णयात नमूद मध्यम स्वरूपाचा दुष्काळ जाहीर केलेल्या खालील तालुक्यातील-

अ.क्र.	जिल्हा	तालुके
१	यवतमाळ	राळेगाव, दिग्रस, घाटंजी, केळापूर व यवतमाळ
२	वाशिम	वाशिम
३	जळगाव	मुक्ताईनगर व बोदवड

क) संदर्भाधीन अ.क्र. २ येथील महसूल व वन विभाग शासन निर्णय दि. २८.२.२०१८ च्या सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केलेल्या जिल्हयातील ज्या गावांमध्ये हंगामी पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आहे त्या सर्व गावांतील -

अल्पमुदत पीक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात (कालावधी **५** वर्ष) पुनर्गठन करण्यास मान्यता व शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने, राष्ट्रियकृत बँका, व्यापारी बँका,महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई व संबंधित जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

सुलभ संदर्भासाठी उपरोक्त दि.२८.२.२०१८च्या शासन निर्णयाचे परिशिष्ट "अ" यासोबत जोडले आहे, संदर्भाधीन शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

३. खरीप पीक कर्जाच्या परतफेडीचा दिनांक. ३१ मार्च१८ व रब्बी पीक कर्जाच्या परतफेडीचा दि.३० जून १८ असल्याने वरीलप्रमाणे बाधित गावातील जे शेतकरी विहीत मुदतीत पीक कर्जाची परतफेड करु शकणार नाहीत अशा शेतकऱ्यांची संमती घेऊन सन २०१७-१८ च्या खरीप व रब्बी हंगामातील पीक कर्जाचे व्याजासह मध्यम मुदत कर्जात (कालावधी ५ वर्ष) पुनर्गठन करण्यात यावे. खरीप पीक कर्जाच्या पुनर्गठनाची कार्यवाही सर्व बँकांनी दि. ३० जुलै, २०१८ पर्यंत पूर्ण करुन अशा शेतकऱ्यांना खरीप२०१८ या हंगामासाठी पीक कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे. या शासन परिपत्रकाची अंमलबजावणी कटाक्षाने करण्यात येईल याची सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे यांनी दक्षता घ्यावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१८०६०११५४६४९२००२ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co- Operation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2018.06.01 15:48:57 +05'30'

(रमेश शिंगटे)

अवर सचिव तथा सहनिबंधक, सहकारी संस्था,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई ३२.
२) मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिवमंत्रालय, मुंबई ३२.
३) मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई ३२.
४) मा. विधानसभा सदस्य व विधान परिषद सदस्य (सर्व)
५) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) आयुक्त, कृषी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

८) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

९) समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती (SLBC) बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे

१०) जिल्हाधिकारी(सर्व)

११) सह सचिव, भारत सरकार, कृषी मंत्रालय (सहकार विभाग) कृषी भवन, नवी दिल्ली.

१२) महाव्यवस्थापक, राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक, प्रादेशीक कार्यालय, पुणे

१३) मुख्य अधिकारी, आर.बीय आय, ॲग्रिकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफीस, गारमेंट हाऊस, मुंबई१८

१४) उप मुख्य अधिकारी,आर.बी. आय, ॲग्रिकल्चरल क्रेडीट डिपार्टमेंट, सेंट्रल ऑफीस, गारमेंट हाऊस, मुंबई १८

१५) विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था.(सर्व)

१६) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.(सर्व)

१७) कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक(सर्व)

१८) प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई

१९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

२०) सर्व कार्यासने, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

२१)निवड नस्ती - २स

शासन निर्णय क्र एससीवाय-२०१७/प्र.क्र.२७०/म-७
दिनांक- २८ फेब्रुवारी, २०१८
सन २०१७-१८ सालातील खरीप पिकांच्या अंतीम पैसेवारीचा गोषवारा
“परिशिष्ट - अ”

अ.क्र.	विभाग	जिल्हा	अंतीम पैसेवारी जाहीर केलेली गावे	५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे	५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे
१	कोकण	ठाणे	८९१	०	८९१
		पालघर	९७४	०	९७४
		रायगड	१८९५	०	१८९५
		रत्नागिरी	१५१२	०	१५१२
		सिंधुदुर्ग	७३३	०	७३३
	एकूण		**६००५**	**०**	**६००५**
२	नाशिक	नाशिक	१६७७	०	१६७७
		धुळे	५९६	१८०	४१६
		नंदुरबार	८५६	०	८५६
		जळगांव	१५०२	८१४	६८८
		अहमदनगर	५८२	८	५७४
	एकूण		**५२१३**	**१००२**	**४२११**
३	पुणे	पुणे	१२९८	०	१२९८
		सातारा	१४९५	१६	१४७९
		सांगली	६३१	२८५	३४६
		सोलापूर	प्रामुख्याने रब्बी जिल्हा असल्याने खरीप पिकांची पैसेवारी जाहीर केली जात नाही.		
		कोल्हापूर	१२१२	०	१२१२
	एकूण		**४६३६**	**३०१**	**४३३५**
४	औरंगाबाद	औरंगाबाद	१३५४	१३५४	०
		जालना	९७१	३५	९३६
		परभणी	८४९	८४९	०
		हिंगोली	७०७	०	७०७
		नांदेड	१५६२	११६८	३९४
		बीड	१४०२	०	१४०२
		लातूर	९४३	१७१	७७२
		उस्मानाबाद	७३७	०	७३७
	एकूण		**८५२५**	**३५७७**	**४९४८**

अ.क्र.	विभाग	जिल्हा	पैसेवारी जाहीर केलेली गावे	५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेली गावे	५० पैशांपेक्षा जास्त पैसेवारी असलेली गावे
५	अमरावती	अमरावती	१९६३	१९६३	०
		अकोला	९९०	९९०	०
		यवतमाळ	२०४९	२०४९	०
		वाशिम	७९३	७७४	१९
		बुलडाणा	१४२०	७४८	६७२
	एकूण		**७२१५**	**६५२४**	**६९१**
६	नागपूर	नागपूर	१७८७	०	१७८७
		वर्धा	१३३९	०	१३३९
		भंडारा	८४३	५४४	२९९
		गोंदिया	९१९	७७१	१४८
		चंद्रपूर	१७९४	१७९४	०
		गडचिरोली	१४७९	१६६	१३१३
	एकूण		**८१६१**	**३२७५**	**४८८६**
राज्याची एकूण			**३९७५५**	**१४६७९**	**२५०७६**